**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी उद्या बैठक
- अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूची सीआयडीकडून चौकशी
- राज्यभरात महापौर आणि उपमहापौर निवडीच्या हालचालींना वेग

**आणि**

- चांदीच्या किंमतीमध्ये तब्बल ४० हजार तर सोन्याच्या किंमतींमध्ये साडे ९ हजार रुपयांची घसरण

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसनं विधिमंडळ पक्षाची उद्या बैठक बोलावली आहे. त्यात विधीमंडळ पक्षनेत्याची निवड होईल अशी माहिती पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

**होल्ड - भुजबळ बाइट**

उद्या विधिमंडळ पक्ष नेता निवडीचा निर्णय झाला तर तातडीनं शपथविधी होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सुरु असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे. याबाबत पक्षाच्या सर्व आमदारांना बोलवून त्यांच्याशी चर्चा करून, जनभावनेचा आदर करून आम्हाला निर्णय घ्यायचा आहे, ते लवकरच घेऊ, हे आम्ही मुख्यमंत्र्यांना सांगितलं, अशी माहिती प्रफुल्ल पटेल यांनी दिली.

**होल्ड - प्रफुल्ल पटेल**

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास सीआयडी अर्थात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवण्यात आला आहे. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती.

**<><><><><>**

गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवपदी मनिषा पाटणकर-म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आय.एस. चहल यांच्या सेवानिवृत्तीमुळे हे पद रिक्त होत आहे. चहल यांच्या निवृत्तीनंतर मनिषा पाटणकर-म्हैसकर हा पदभार स्विकारतील. मनिषा म्हैसकर सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव आहेत. त्यांच्या जागी मिलिंद म्हैसकर यांच्या नियुक्तीची आदेश जारी केला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुका झाल्यानंतर महापौरपद आणि उपमहापौरपदाच्या निवडणुकांसाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

## होल्ड व्हाइस कास्ट

***(अकोला*** *महानगरपालिकेत आज महापौरपदी भाजपाच्या शारदा खेडकर ४५ मतं मिळवून निवडून आल्या. प्रतिस्पर्धी उमेदवार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सुरेखा काळे यांना ३२ मतं मिळाली. उपमहापौरपदी भाजपाचे अमोल गोगे याच मतफरकाने निवडून आले. अकोल्यात भाजपाला स्पष्ट बहुमत नव्हतं, मात्र शहर सुधार आघाडी करुन ४५ मतं त्यांच्या उमेदवारांनी मिळवली. एमआयएमचे नगरसेवक तटस्थ राहिले.*

***ठाणे, कल्याण- डोंबिवली आणि उल्हासनगर*** *महापालिकांमधे महापौरपद शिवसेनेला तर उपमहापौरपद भाजपाला मिळालं आहे. त्यानुसार ठाण्यात शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांनी महापौरपदासाठी आणि भाजपाचे कृष्णा पाटील यांनी उपमाहपौरपदासाठी अर्ज दाखल केले. कल्याण डोंबिवलीमधे शिवसेनेच्या हर्षाली थविल- चौधरी यांनी महापौरपदासाठी तर भाजपाचे राहुल दामले यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केले. उल्हासनगरमधे शिवसेना पुरस्कृत उमेदवार अश्विनी निकम यांची महापौर म्हणून तर भाजपाचे अमर लुंड यांची उपमहापौर म्हणून उमेदवारी अर्ज भरले. या सर्वांची निवड बिनविरोध होणार असून येत्या ३ फेब्रुवारीला त्याची अधिकृत घोषणा होईल.*

***वसई - विरार** महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदासाठी येत्या ३ फेब्रुवारीला निवडणूक होणार असून महापौरपदासाठी ४ तर उपमहापौरपदासाठी ३ जणांनी अर्ज दाखल केले.*

*पुणे महापालिकेची महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक येत्या 9 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता होणार आहे. या पदांसाठी 3 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येतील. विशेष सभेत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक होणार आहे.*

***नवी मुंबई** महानगरपालिकेत महापौर आणि उपमहापौरपदासाठी येत्या ५ फेब्रुवारीला होईल. **नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव** महानगरपालिकेत ६ फेब्रुवारीला तर **मालेगाव**मधे ७ फेब्रुवारीला निवडणूक होईल. पुणे आणि **लातूर**मधे ९ फेब्रुवारीला या ठिकाणी 3 फेब्रुवारीला उमेदवारी अर्ज दाखल करता येतील.*

***छत्रपती संभाजीनगर आणि चंद्रपूर** महापालिकेत महापौर आणि उपमहापौरपदासाठी निवडणूक १० फेब्रुवारीला होणार आहे.)*

**<><><><><>**

देशात आज सोनं आणि चांदीच्या दराच विक्रमी घसरण दिसून आली. चांदीचे दर एकाच दिवसात किलोमागे तब्बल ४० हजार ६०० रुपयांनी घसरले. त्यामुळे मुंबईच्या सराफा बाजारात एक किलो चांदीसाठी ३ लाख ४९ हजार ५०० रुपयांहून अधिक रक्कम मोजावी लागत होती.

सोन्याच्या किंमतीही आज सुमारे साडे ९ हजार रुपयांनी घसरल्या. त्यामुळं १ तोळा २४ कॅरेट सोन्याच्या किंमती १ लाख ७० हजार ७०० तर १ तोळा २२ कॅरेट सोन्याच्या किंमती १ लाख ६६ हजार ६०० रुपयांच्या पलीकडे गेल्या होत्या.

कमोडिटी बाजारांमध्ये ही घसरण यापेक्षाही अधिक होती. मोठ्या प्रमाणात झालेली नफेखोरी यामुळं या किंमतीत घसरण झाली. याशिवाय फेडरल रिझर्व्हच्या अध्यक्षपदी केविन वॉर्श यांच्या नावाची घोषणा होणार आहे. डॉलर मजबूत करण्यासाठी ते आणखी आक्रमक भूमिका घेतील आणि त्याचा दबाव सोन्या चांदीवर येईल या कारणानं ही घसरण झाल्याचं विश्लेषकांचं मत आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज २९७ अंकांची घसरण झाली आणि तो ८२ हजार २७० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ९८ अंकांची घसरण नोंदवून २५ हजार ३२१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

राज्यात सद्यःस्थितीत ७ कोटी ७७ लाख ४१ हजार मेट्रिक टनांहून अधिक ऊस गाळप पूर्ण झाले आहे. तर ९ पूर्णांक १ टक्के निव्वळ उताऱ्यानुसार साखरेचे ७१लाख मेट्रिक टन इतके उत्पादन तयार झालेले आहे. राज्यातल्या 206 साखर कारखान्यांकडून प्रतिदिन 10 लाख 43 हजार 550 मे.टन ऊसगाळप सुरू असून हंगाम जोमाने सुरू आहे. सध्याची ऊस गाळप क्षमता विचारात घेतल्यास शिल्लक उसाचे गाळप हे फेबुवारी महिनाअखेर किंवा 10 मार्चपर्यंत चालू राहून यंदाचा हंगाम संपण्याची अपेक्षा असल्याचं साखर आयुक्तालयाचे साखर सह संचालक महेश झेंडे यांनी सांगितलं आहे.

<><><><><>

प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथानं मिळवलेला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार आज नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. राज्याची संस्कृती आणि परंपरांचं दिमाखदार दर्शन घडवणारा हा चित्ररथ 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित होता. या चित्ररथाचा विषय केवळ धार्मिक नसून तो आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरणावर आधारित होता.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या अर्धापूरचे तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांच्या शासकीय वाहनाला आज ट्रॅक्टरने धडक दिल्याने तहसीलदारासह दोन जण जखमी झाले. या प्रकरणी अर्धापूर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल झाला आहे.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान राबवण्यासाठी आज जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची बैठक झाली. जिल्ह्यातल्या परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत

बैठकीत सविस्तर चर्चा झाली. संवेदनशील परीक्षा केंद्रांवर भरारी पथकं  नेमण्याचा निर्णयही घेण्यात आला. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून जबाबदारीनं काम करावं, ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीचं काटेकोर पालन करावं, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

**<><><><><>**

राज्यात येत्या ७ फेब्रुवारीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी मतदान होणार असून ९ फेब्रुवारीला मत मोजणी होणार आहे. त्याचदिवशी आंगणेवाडीच्या श्री भराडी देवीचा वार्षिक जत्रोत्सव सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावं असं आवाहन जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे आणि पोलीस अधिक्षक डॉ. मोहन दहिकर यांनी संयुक्त निवेदनाद्वारे केलं आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक स्पर्धेत दिल्ली विरुद्धच्या सामन्यात दुसऱ्या दिवस अखेर मुंबईनं ४५ धावांची आघाडी घेतली आहे. मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातल्या शरद पवार मैदानावर हा सामना सुरू आहे. काल दिल्ली संघाने २२१ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना मुंबईनं आज दिवसअखेर ५ बाद २६६ धावा घेतल्या होत्या. सिद्धेश लाड शतक करुन खेळतो आहे. मुशीर खान यानं अर्धशतक केलं.

**<><><><><>**

महिला प्रिमिअर लीग क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. वडोदरा इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. गुजरातनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**